थोडक्यात...

केशव विद्यालयाचा एसएससी परीक्षेचा निकाल ८९.१३%

पारोळा । येथील केशव माध्यमिक विद्यालयाचा एस एस सी परीक्षेचा निकाल ८९.१३ टक्के लागला यावर्षी प्रविष्ठ विद्यार्थी ४६ उत्तीर्ण झाले. यात प्रथम आकाश विजय पाटील (८२.६० टक्के) द्वितीय पूजा भरत पाडवी (८१.०) तृतीय परेश कोमलसिंग पाटील (शे. गुण ७९.२०) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष प्रदीप चौधरी सचिव प्रवीण दाणेज, मुख्याध्यापक अ. दे. भामरे यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

गुढे । येथे संस्कृत पंडित,राष्ट्रवीर, स्वराज्यरक्षक ,बुधभूषण,नायिकाभेद,नखशिखांत, सातसतक या ग्रंथांचे निर्माते,अजिंक्य,अपराजित, शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त स्वराज्य जननी राष्ट्रमाता जिजाऊ,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजीराजे महाराजाचे प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी शंभुराजे प्रेमी तरूण वर्ग मोठ्या उपस्थित होते.

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेले...

विदेश शिक्षण शिष्यवृत्तीचे संकेतस्थळ ठरतेय अकार्यक्षम

समता परिषदेचा आंदोलनाचा इशारा

- अर्जदार विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी
- शासनाने तत्परता दाखविण्याची अपेक्षा

अमळनेर । प्रतिनिधी

ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेसाठी असलेले अधिकृत संकेतस्थळ गेल्या काही दिवसांप्रासून अकार्यक्षम झाल्यामुळे अर्जदार विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सदर समस्येबाबत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, जळगाव शाखेच्या वतीने अमळनेर येथील मा. प्रांताधिकारी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात समता परिषदचे जळगाव जिल्हाउपाध्यक्ष भिमराव महाजन यांनी शासनाच्या तांत्रिक अकार्यक्षमतेकडे लक्ष वेधले असून, अनेक पात्र विद्यार्थ्यांना संकेतस्थळ बंद असल्यामुळे अर्ज दाखल करता आलेला नाही. परिणामी, त्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

◆ निवेदनात पुढे म्हटले आहे की, सदर योजना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देते. मात्र, तांत्रिक कारणांमुळे संकेतस्थळावर अर्ज न झाल्यास ही संधी त्यांच्या हातून निसटण्याचा धोका आहे. शासनाने ही समस्या गांभीर्याने न घेतल्यास आणि तातडीने उपाययोजना न केल्यास, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, जळगाव यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

समता परिषदेकडून करण्यात आलेल्या मागण्या

१) शिष्यवृत्ती योजनेचे संकेतस्थळ त्वरित सुरु करणे, २) अर्ज प्रक्रियेत अडथळा येणार नाही याची हमी घेणे, ३) आणि संकेतस्थळ बंद असल्यामुळे गमावलेला वेळ भरून काढण्यासाठी अर्जाची अंतिम तारीख वाढवणे या मुख्य मागण्या आहेत.

या निवेदनामुळे ओबीसी विद्यार्थ्यांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास आल्या असून, आता शासन या बाबतीत किती तत्परतेने कार्यवाही करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लोकनेते ओंकार आप्पा वाघ जयंतीनिमित्त बांबरुड येथे अभिवादन कार्यक्रम

बांबरुड । वार्ताहर

पाचोरा तालुक्याची माजी आमदार स्वर्गीय लोकनेते ओंकार नारायण वाघ यांची जयंती बांबरुड राणीचे येथे साजरी करण्यात आली

याबाबत सविस्तर वृत्त असे की पाचोरा तालुक्याचे माजी आमदार खानदेश चा ढाण्या वाघ म्हणून परिचित असलेले लोकनेते स्वर्गीय ओंकार नारायण वाघ यांची ९३ वी जयंती पाचोरा तालुका शिक्षण संस्था संचलित येथील डॉक्टर राम मनोहर लोहिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील स्वर्गीय ओंकार आप्पा वाघ यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या शक्ती स्थळाला मान्यवरांनी भेट देऊन पुष्पांजली अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली सर्वप्रथम शक्ती स्थळाला फुलांनी सजवून स्वर्गीय ओंकार आप्पा यांचे प्रथमे सुपुत्र पाचोरा भडगाव तालुक्याचे माजी आमदार दिलीप भाऊ वाघ पिटीसी चेअरमन संजय वाघ स्कूल कमिटीचे चेअरमन दादाराव वाघ पंचायत समिती सदस्य ललित वाघ भूषण वाघ त्याचप्रमाणे विविध संस्थांचे पदाधिकारी चेअरमन आप्तेष्ट मित्रपरिवार तालुक्यातील पिटीसी शिक्षण संस्थेतील शिक्षक वर्ग कर्मचारी त्याचप्रमाणे सरपंच व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वर्गीय ओंकार पवार यांच्या शक्ती स्थळाचे दर्शन घेऊन आदरांजली वाहिली त्याचप्रमाणे स्वर्गीय ओंकार आप्पा वाघ यांच्या कार्याची आठवण राहावी म्हणून विद्यापीठातर्फे विविध स्पर्धेचे आयोजन करावे असे अशी अपेक्षा खालील देशमुख यांनी आपल्या मनोगत व्यक्त केली त्याचप्रमाणे विद्यालयाचे प्राचार्य डी व्ही पाटील सर यांनी सूत्रसंचालन करत उपस्थित आमचे आभार मानले यावेळी तालुक्यातील विविध राजकीय पदाधिकारी कार्यकर्ते गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

पाचोरा येथे नरसिंह जयंती महोत्सव, भगवद्गीता सत्संग

चैतन्य जीवन प्रभूजींचे भावस्पर्शी प्रवचन

पाचोरा । प्रतिनिधी

येथील श्री जगन्नाथ इस्कॉन मंदिर, पाचोरा येथे रविवार, ११ मे रोजी नरसिंह जयंती महोत्सव व भगवद्गीता साप्ताहिक सत्संग मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. सायंकाळी ६ ते ८.३० या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात कथा, कीर्तन, पुष्प अभिषेक आणि महाप्रसाद यांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात देशासाठी बलिदान दिलेल्या शहीदांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. दीपप्रज्वलन व सामूहिक मौनाच्या माध्यमातून उपस्थितांनी शहीदांना कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे इस्कॉनचे प्रवक्ते श्रीमंत चैतन्य जीवन प्रभुजी यांचे हृदयस्पर्शी प्रवचन. त्यांनी भगवान नरसिंह देवाच्या अवतारामागील गूढ आणि भक्त प्रल्हादाच्या श्राद्धचे महत्त्व प्रभावी भाषेत उलगडले. प्रभुजी म्हणाले, भगवान नरसिंह हे केवळ क्रोधाचे नव्हे, तर भक्तवत्सल्यतेचे सर्वोच्च रूप आहेत. संकटात असलेल्या भक्ताच्या रक्षणासाठी प्रभू कोणतीही मर्यादा ओलांडतात.

प्रह्लादाच्या निःस्वार्थ भक्तीचा दाखला देत त्यांनी उपस्थितांना आत्मपरीक्षणाचा संदेश दिला. आपणही प्रह्लादासारखे निडर आणि पूर्ण विश्वासाने प्रभूचे स्मरण करणारे होऊ शकतो का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित भाविकांना विचारला.

प्रभुजींच्या प्रवचनातुन 'हरे कृष्ण' नामस्मरणाचे सामर्थ्य पटवून देण्यात आले. संकट कितीही मोठं असलं, तरी हरे कृष्ण महामंत्र हेच खरे शरण आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या कीर्तनाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हालेला होता, अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

यानंतर भारतभूमीस अधिक बळकट व समृद्ध होण्यासाठी भगवान श्री जगन्नाथांच्या चरणी 'रत्नाकर' अर्पण करण्यात आले. या राष्ट्रभक्तिपूर्ण क्षणांनी वातावरणात नवचैतन्याची लहर उमटवली.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. परिसरातील शेकडो भाविकांनी या दिव्य आयोजनाचा लाभ घेतला.

यावेळी पद्मना प्रभुजी, रमेशजी मोर, संजय सिंघानिया, रामचरित्रदास प्रभुजी, मनोज प्रभुजी यांच्यासह अनेक मान्यवर व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुढे । ता. भडगाव, वार्ताहर

ऐन उन्हाळ्यात लिंबू मोठी मागणी व तेजी असल्याने लिंबू उत्पादक शेतकरी मोठ्या खुशीत,आनंदी असतांनाच अचानक गेल्या पंधरवड्यापासून खराब वातावरण,अवकाळी पाऊस वारा वादळ दररोजचे खराब वातावरणामुळे हिरवे सोने समजल्या जाणाऱ्या लिंबूच्याभावात निम्म्या भावावर मोठी घसरण झाल्याने लिंबू उत्पादक शेतकरी नाराज,दु:खी झाला असून ऐन उन्हाळ्यात लिंबूला बाजारपेठेत मोठी मागणी असल्यामुळे लिंबू मंदीच्या फेऱ्यात सापडल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे अशी माहिती लिंबू उत्पादक शेतकरी बंधू किसन निंबा माळी,दिलीप निंबा माळी यांनी दै.देशदूतशी बोलताना शेतकऱ्यांच्या व्यथा मांडली शासनाने उन्हाळी हंगामातील लिंबू फळांला विम्याचे संरक्षण देण्याची मागणी केली याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासन दरबारी आवाज उठवावा व शेतकऱ्यांनी उन्हाळी लिंबू विमा योजना तातडीने लागू करावी अशी मागणी केली आहे.

सध्या उन्हाळी बहाराचा लिंबू माल बहार बऱ्यापैकी निघत होता आणि मागणी देखील सर्वत्र होती अपेक्षा पेक्षा जरी भाव जेमतेमच असतांनाही लिंबू उत्पादक शेतकरी आनंदी होता पुढे एक महिना कडक उन्हाळा राहील अशी आशा लागली असतानाच ऐन उन्हाळ्यात में महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात खराब वातावरणाचा फेऱ्यात आल्याने बाजारपेठेत लिंबू मागणीत घट आणि बाजार भाव निम्म्यावर फार कमी झाला. उन्हाळा ऋतूच्या मौसमात अनेकजण जीवांची लाहीलाही थांबविण्यासाठी औषधी गुणधर्म असलेल्या लिंबूचे सरबत मोठ्या प्रमाणात घेतात तसेच बाजारपेठ सर्वत्र लिंबू खात,पित असतात म्हणून मागणी वाढत जाते असते म्हणून सर्वदूर लिंबू फळांची मागणी असते म्हणून आपोआप भाव मिळत असल्याने गेल्या महिन्याभरापूर्वी लिंबूला स्थानिक व सुरत बाजारपेठेत गेले पंधरा दिवस १२० किलो असा देखील चांगला दर भाव मिळाला होता त्यानंतर बाजारपेठ आंबा दाखल झाला असे कारण देऊन व्यापारी यांनी कानाला कान लावून लिंबू ८० ते ९० किलो असा भाव देऊ लागले अशा परिस्थितीत बाजारपेठ लिंबू मोठी मागणी व तेजी दिसून येत होती पुन्हा भाववाढीची आशा लागली होती म्हणून शेतकरी आनंदी असतांनाच हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार ५ में रोजी दुपारपासून अचानक खराब वातावरण निर्माण झाले काही ठिकाणी वादळ वाऱ्यासह पावसाने झोडपून काढले सर्वत्र नुकसान झाले ५ मे पूर्वी लिंबूला स्थानिक व सुरत बाजारपेठ९० ते १०० रुपये किलो असा भाव मिळत होता आता पंधरवड्यापासून चांगल्या लिंबूला वातावरणाचा मोठा फटका बसला आणि ४० ते ५० रुपये व मध्यमप्रतीच्या लिंबूला २० ते २५ रूपये अतिशय कमी असा कवडीमोल भाव मिळत आहे. लिंबू बागेत लिंबू काढणी ते बाजारपेठत पर्यंत पोचविण्यासाठी एका क्रेटमध्ये २० ते २२ किलो लिंबूला ८० ते ९० रूपये मजुरीसह वहातुक खर्च येतो आणि उत्पन्न मात्र कमी येत असल्याने मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.

खराब वातावरणाचा हिरव्या सोन्याला फटका

भावात मोठी घसरण

घरून मजुरी देण्याची वाईट वेळ लिंबू उत्पादक शेतकऱ्यांवर आली आहे.पण बागेमधुन लिंबू काढण्या शिवाय काही पर्यायच नाही म्हणून शेतात पावसाळ्यापूर्वी घाण होण्यापूर्वी त्यांची काढणी आवश्यक आहे.लिंबू उत्पादक शेतकरी कधी मंदी कधी थंडी अशा कात्रीत सापडला असतो म्हणून तो वातावरण बदल्यांची आणि लिंबूला भाववाढ होईल यांची प्रतिक्षा लागली असते तसेच आता उन्हाळा ऋतू असतांनाच अचानक पंधरवड्यापासून खराब वातावरण निर्माण झाले आहे म्हणून शेतकरी काळजीत पडला आहे हे खराब वातावरण पुन्हा चांगले होईल आणि लिंबू पुढील पंधरवडा का असेना अपेक्षित भाव मिळेल ही आशा लागली पण वातावरण जैसे थे आहे म्हणून शेतकरी हतबल झाला आहे.

हिरवे सोन्याला विमा कवच नसल्याने उत्पादकाची नाराजी

भारतीयकृषीविमाकंपनीनेभारतीयहवामानावर आधारित आंबिया बहार२०२४/२५ फळपिक विमा योजनेत संत्री, मोंसबी,द्राक्षे,केळी,काजु व डाळिंब आदी फळपिकांचा समावेश करून विमा योजना लागू केली असून मात्र या महत्वपूर्ण योजनेत लिंबू फळाला वगळल्याने राज्यभरातील लिंबू उत्पादक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली असून या महत्वाच्या लिंबू फळाला विमा योजनेत समाविष्ट करण्यात यावे यासाठी लोकप्रतिनिधी यांनी शासनदरबारी प्रयत्न करावा अशी मागणी होत आहे.

वर्षभरात लिंबूचे मृग,आंबेहार,हस्त असे तीन बहार येतात यापैकी मृग व आंबे बहार,फळाला अपेक्षित भाव मिळतच नाही म्हणून हस्त बहारातच लिंबू उत्पादकांना दोन पैसे मिळतात म्हणून हाच बहार शेतकऱ्यांचा तारणहार आहे पण या बहाराला मात्र निसर्गाचा मात्र मोठा शाप व धोका देखील तेवढाच आहे.हा बहार मात्र ऊन,वारा,अवकाळी पाऊस, गारपीट,वादळ, तसेच खराब वातावरण यांचा मोठा धोका असतो म्हणून या बहाराला विम्याचे कवच फारच अत्यावश्यक आहे पण विमा कंपनीने मनमानी कारभार करून या फळाला विमा कंपनीने तुघलकी निर्णय घेऊन वगळले आहे.म्हणून लिंबू उत्पादक शेतकरी प्रंचड नाराज झाले असून नवनिर्वाचित आमदारांनी या फळाचा विमा योजनेत समाविष्ट साठी प्रयत्न करावा अशी मागणी होत आहे.

गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शेतकरी कन्या प्रथम

गोराडखेडा । वार्ताहर

येथील प्रगतिशील शेतकरी कैलास नारायण पाटील यांची नात, ग्रामपंचायत सदस्य पुष्पा पाटील व निलेश पाटील यांची कन्या रुचिता निलेश पाटील हिणे गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल येथे प्रथम क्रमांक मिळविला आहे. एसएससी मार्च २०२५ परीक्षेत ९४.४०% गुण मिळवत ऋचिताने विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. प्राचार्य प्रेम शामनाणी, संस्थाचालक तथा सचिव नेहा शामनाणी, प्रशासक मनोज राजपूत, रवी आहुजा, रवि आहुजा, असेना बोहरा, यासह विद्यार्थी व पालक आदींनी ऋचिता हिचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

इकरा कॉलेजमध्ये गुणपत्रकांचे वितरण

जळगाव । प्रतिनिधी

इकरा शाहीन ज्युनिअर कॉलेज, मेहरूण येथे बारावीच्या निकालानंतर करिअर मार्गदर्शन व गुणपत्रक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दहावी व बारावीच्या निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ गुणपत्रक वितरणाबरोबरच करिअर मार्गदर्शन कार्यक्रम घेतला जातो.

हा कार्यक्रम इकराच्या एच. जे थीम कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या कादिर खान मोतीवाला सभागृहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात कुरआन पठणाने झाली. संस्थेचे हाजी नबील काझी जमीरुद्दीन सईदुद्दीन यांनी प्रारंभिक शब्द सादर केले. इकरा एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी एजाज मलिक यांनी इतिहासातील उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. एच. जे थीम कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे व्हाईस प्रिन्सिपल डॉ. वकार शेख यांनी यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांबद्दल मार्गदर्शन केले. इकरा उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सालारनगर जळगावचे प्रिन्सिपल डॉ. हारून बशीर यांनी इकरा शाहीन नीट अकॅडमीचा सविस्तर परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार होते. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून इकरा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व संचालक झबीहुल्ला शहा, एस. एम. झफर, गुलाम नबी बागवान, अब्दुल अजीज सालार, अमीनुद्दीन बडीवाला, शेख तारिक अन्वर, आसिफ इक्बाल शहा, रमिज बडीवाला, इरफान सालार व इकरा शाहीन ज्युनिअर कॉलेजचे प्रिन्सिपल जमीर काझी व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इफ्तिखार अहमद यांनी केले आणि आभार प्रदर्शन इकरा शाहीनचे सुपरव्हायझर शेख जाकीर बशीर यांनी केले.

जिल्हा लेवा पाटीदार मंडळ आणि महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघ आयोजित

मूल्यशिक्षण-हसत खेळत उन्हाळी शिबिराचा समारोप

जळगाव । प्रतिनिधी

जिल्हा लेवा पाटीदार मंडळ आणि महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघ आयोजित बहिणाबाई विद्यालय, जळगांव या ठिकाणी सहा दिवसीय

मूल्यशिक्षण- हसत खेळत उन्हाळी शिबिराचा अतिशय खेळीमेळीच्या आणि भावूक वातावरणात हा समारोप झाला.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाव हल्ल्यातील मृत पावलेल्या नागरिकांना शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर शब्द सुमनांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थित पालकांचं स्वागत करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाचे अध्यक्ष अरुण बोरोले, जळगाव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ जळगांवचे अध्यक्ष लिलाधर चौधरी, मूल्यशिक्षण-हसत खेळत या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ मिलिंद पाटील,

बहिणाबाई विद्यालयाचे मुखाध्यापक डॉ विलास नारखेडे, प्रवीण खडके, नीता वराडे, डॉ ज्योती महाजन, संगीता भोळे, सीमा गाजरे आदी उपस्थित होते. याचसोबत विविध विषयातील पारंगत ट्रेनर्स प्रा डॉ सुनीता चौधरी, शुभांगी चौधरी, प्राजक्ता चौधरी, नीलिमा राणे, नीला चौधरी, डॉ निलांबरी पाटील, एन ओ चौधरी, महेंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वराडे, संगीता पाटील, वासंती चौधरी यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ मिलिंद पाटील यांनी केले. यात त्यांनी या सहा दिवसीय शिबिरासाठी इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला होता. प्रवेश सर्व समाजासाठी खुला होता. यात आयोजकांचे प्रथम वर्ष असूनही ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला हे विशेष. असे नमूद केले आणि सहा दिवसांचा गोषवारा विशद केला आणि त्यासाठी नियोजनापासून तर दैनंदिन आयोजनापर्यंत त्यांच्या टीमने केलेल कार्याविषयी कल्पना दिली.

विद्यार्थ्यांना आणि पालकांना महासंघाचे अध्यक्ष अरुण बोरोले यांनी महासंघाची भूमिका स्पष्ट केली आणि मार्गदर्शन केले. यात त्यांनी पालकांनाही समुपदेशनाची गरज असल्याची गरज सामाजिक घटकांकडून सांगण्यात आल्याचे स्पष्ट केले आणि त्यासाठी लवकरच शिबिराचे आयोजनाची माहिती दिली. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ मिलिंद पाटील यांनी तर आभार प्रदर्शन नीता वराडे यांनी केले.